सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक


https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on


E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ११७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १७ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# ठाकरेंचा पक्ष फुटला, ९ पैकी ६ खासदारांचा वेगळा गट!

## लोकसभा अध्यक्षांना सोपवले पत्र; ४ वर्षांपूर्वी ३९ आमदारांसह वेगळे झाले होते शिंदे





भाऊसाहेब वाकचौरे, शिर्डी | नागेश पाटिल आष्टीकर, हिंगोली | संजय दिना पाटील, मुंबई ईशान्य | संजय हरिभाऊ जाधव, परभणी | ओमप्रकाश राजे, निंबाळकर | संजय देशमुख, यवतमाल-वाशीम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मुंबई–** महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या (यूबीटी) नऊ खासदारांपैकी सहा खासदारांनी बंड केले आहे. सूत्रांनुसार, या सहा खासदारांनी बुधवारी सकाळी ९:३० वाजता लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र पाठवून शिंदे गटाच्या शिवसेनेत विलीनीकरणाची विनंती केली आहे.

सूत्रांनुसार, पत्र पाठवणाऱ्या खासदारांमध्ये नागेश आष्टीकर आणि संजय दिना पाटील यांचा समावेश आहे. संजय दिना पाटील यांनी पक्ष सोडण्याच्या चर्चा फेटाळून लावत म्हटले आहे की, मी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचा खासदार आहे आणि पक्षातच राहीन. दरम्यान, शिवसेनेचे (यूबीटी) राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी दिल्लीत एका पत्रकार परिषदेत बंडखोर खासदारांना शिवीगाळ केली. राऊत शिवीगाळ करताना म्हणाले, हे बेईमान लोक आहेत. बेईमानी त्यांच्या रक्तात आहे. उद्धव ठाकरेंनी त्यांना भावासारखे वागवले आणि हे *ददण* लोक, मी बोललेलं कट करू नका, असेही म्हणाले. ते नंतर माध्यमांना म्हणाले. असे शब्द मराठीत सर्रास बोलले जातात.

गेल्या चार वर्षांतील शिवसेनेतील ही दुसरी फूट आहे. यापूर्वी, जून २०२२ मध्ये, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ३९ आमदार शिवसेनेतून बाहेर पडले होते. या बंडामुळे उद्धव ठाकरे सरकार कोसळले होते. त्यानंतर शिंदे गटाला पक्षाचे मूळ शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाणाचे चिन्ह मिळाले.

सूत्रांच्या माहितीनुसार, लोकसभा अध्यक्षांनी या गटाला प्राथमिक मान्यता दिल्यानंतर उद्धवसेना नेतृत्वात खळबळ उडाली आहे. या घडामोडींची माहिती मिळताच खासदार संजय राऊत यांनी तातडीने संसद भवनात धाव घेत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची २० मिनिटे भेट घेतली आहे. या बैठकीत त्यांच्यासोबत खासदार अरविंद सावंत व अनिल देसाईही सोबत होते.

### ठाकरे गटाची बाजू ऐकून घ्यावी, राऊतांची मागणी

ठाकरे गटाने यापूर्वीच लोकसभा अध्यक्षांना पत्र देत कोणत्याही फुटीर गटाला स्वतंत्र मान्यता देण्यापूर्वी पक्षाची बाजू ऐकून घेण्याची मागणी केली होती. संसदीय पक्षनेते अरविंद सावंत यांच्या स्वाक्षरीने पाठवलेल्या पत्रात, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हाच संसदेतील अधिकृत पक्ष मानला जावा आणि कोणत्याही फुटीर गटाला विशेष दर्जा किंवा मान्यता देऊ नये, अशी विनंती करण्यात आली होती. आता सहा खासदारांच्या गटाला मान्यता मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर संजय राऊत स्वतः लोकसभा अध्यक्षांकडे उद्धवसेनेची भूमिका मांडणार असल्याचे समजते.

# काँग्रेस भाजपची ‘ए टू झेड’ टीम

## प्रकाश आंबेडकरांची टीका

### काँग्रेसला भाजपला हरवण्यात नव्हे, तर सौदेबाजीत रस



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मुंबई–** वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी भाजप आणि काँग्रेसवर गंभीर आरोप करत टीका केली आहे. भाजप आणि काँग्रेस एकच असल्याचे त्यांनी म्हटले आहे. याविषयी बोलताना त्यांनी नांदेड मतदारसंघातील उदाहरण देखील दिले आहे. तसेच काँग्रेस भाजपची ए टु झेड टीम असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

प्रकाश आंबेडकर ट्विट करत म्हणाले, भाजप = काँग्रेस याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. नांदेड महानगरपालिका निवडणुकीतील काँग्रेसचे उमेदवार रामदास पाटील सुमठणकर होते. हे रामदास पाटील सुमठणकर कोण आहेत? हे तेच रामदास पाटील सुमठणकर आहेत, ज्यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे हिंगोली लोकसभा प्रभारी म्हणून काम पाहिले होते. त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्जही दाखल केला होता, परंतु भाजपचे गिरीश महाजन आणि देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केल्यानंतर तो मागे घेतला.

पुढे प्रकाश आंबेडकर म्हणाले, याचा अर्थ असा की, नांदेड काँग्रेसची पहिली पसंती भाजपशी घनिष्ठ संबंध असलेल्या व्यक्तीला होती. वंचित बहुजन आघाडीच्या नांदेड टीमने काँग्रेसला वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार प्रशांत इंगोले यांना पाठिंबा देण्याची विनंती केली होती. काँग्रेसने नकार दिला. त्याऐवजी, काँग्रेसने शिवसेना (यूबीटी) चे उमेदवार कृष्ण पाटील यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला.

हे कृष्ण पाटील कोण आहेत? तो हिंगोलीचे खासदार नागेश पाटील अष्टिकर यांचा मुलगा आहे, जे भाजपचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेना (शिंदे) मध्ये सामील होण्याच्या तयारीत आहेत. अष्टिकर हे तेच उमेदवार आहेत, ज्यांच्या विरोधात भाजपने रामदास पाटील सुमठंकर यांना उमेदवारी मागे घेण्यास सांगितले होते, ज्यानंतर नागेश पाटील विजयी झाले, अशी माहिती प्रकाश आंबेडकर यांनी दिली आहे.

# ‘बंडखोर खासदारांची फक्त उद्धव ठाकरेंशीच नाही तर महाविकास आघाडीशी गद्दारी - हर्षवर्धन सपकाळ




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई –** उद्धव सेनेतून सहा खासदारांनी केलेली बंडखोरी ही फक्त उद्धव ठाकरे व त्यांच्या शिवसेनेशी केलेली गद्दारी नाही तर काँग्रेसमहाविकास आघाडीशी सुद्धा त्यांनी गद्दारी केलेली आहे. जनतेने यांना महायुतीच्या विरोधात मतदान करून विजयी केले, त्यांचा हा विश्वासघात आहे, अशा गद्दारांना यापुढे जनताच धडा शिकवेल, असा इशारा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाली की, शिवसेना (णइढ ) पक्षातून जे सहा खासदार बंडखोरी करून बाहेर पडले ते महाविकास आघाडीचे उमेदवार होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत या सहा जणांसाठीही काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी प्रचार केला, त्यांच्यासाठी कोणत्याही धमक्यांची पर्वा केली नाही, कोणत्याही आमिषाला बळी पडले नाहीत व जनतेने त्यांच्यावर विश्वास दाखवला, ही बंडखोरी या सर्वांचा अपमान आहे, या सर्वांशी या सहा खासदारांनी गद्दारी केलेली आहे. पैशासाठी लाचार झालेले हे लोक जनतेची सेवा करूच शकत नाहीत, त्यांना फक्त पैसा हवा आहे. पैशाने विकले जाणारे हे लोक कोणाचेही नसतात, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.भारतीय जनता पक्षाने लोकशाही व संवैधानिक मुल्ये पायदळी तुडवत, हम करे सो कायदा, या पद्धतीचा तुघलकी कारभार सुरु केला आहे. सत्ता, सत्ता आणि सत्ता हेच त्यांचे ध्येय असून मागील काही वर्षात निवडणुका म्हणजे ‘पैसा फेक, तमाशा देख’चा खेळ सुरु आहे. निवडणुकीत विजय मिळाला नाही तर विजयी उमेदवारांना पैशाच्या जोरावर विकत घ्यायचे, नाहीतर निवडणुक आयोगाला हाताशी धरून उमेदवारीच रद्द करायची, असा अत्यंत विकृत कारभार सुरु झाला आहे.

हे सर्व प्रकार लोकशाहीस घातक आहेत पण सर्वात दुर्दैवी म्हणजे या सर्व घटनांना विधिमंडळ, संसद व न्यायालय, कुठेही न्याय मिळत नाही ही शोकंतिका आहे. सर्व संस्थांवर भाजपाने कब्जा केला असून दहशतीच्या जोरावर राज्यकारभर सुरु आहे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# तुमचे ‘राजे’ कधी मातोश्रीबाहेर पडले का?

## मुंबईतले ६५ नगरसेवकही तुमच्याकडे राहतील का बघा

### नरेश म्हस्केंचा संजय राऊतांवर पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मुंबई–** १५ कोटींची आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्ष विलीनीकरणाची भाषा करणाऱ्या संजय राऊतांनी स्वतः किती कोटी रुपये घेतले, हे आधी स्पष्ट करावे, असे थेट आव्हान देत शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी राऊतांच्या आरोपांचा खरपूस समाचार घेतला आहे. लोक पक्ष सोडून का जात आहेत याचा कधी विचार केला आहे का, असा सवाल करत तुमचे 'राजे' कधी मातोश्री किंवा मुंबईच्या बाहेर पडले आहेत का? आणि त्यांनी कधी कोणत्या शिवसैनिकाला मदत केली आहे का? अशी प्रश्नांची सरबत्ती करत म्हस्के यांनी ठाकरे गटाच्या



कार्यपद्धतीवर जोरदार टीका केली.

नरेश म्हस्के म्हणाले, उभाठा गटाने आधी आत्मपरीक्षण करावे, आणि मग शिंदे साहेबांना दोष द्यावा, ते खासदार आमच्यासोबत येतील, नाही येतील माहिती नाहीत. पण साधा कार्यकर्ता देखील तुमच्याकडे राहत नाही. ६५ नगरसेवक तुमचे निवडून आले आहेत, पण ते देखील तुमच्याकडे राहतील का? हे बघत रहा आता, असा इशाराही म्हस्के यांनी दिला आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात 'ऑपरेशन टायगर' हा चर्चेचा मुख्य विषय बनला असून, उद्धव ठाकरे गटाच्या नऊपैकी तब्बल सात खासदारांचे पक्षांतर होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. तसेच हे खासदार लवकरच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करतील, असा दावाही या अनुषंगाने केला जात आहे.

# मान्सूनला विलंब, विदर्भात २५ जून ते १ जूलैपर्यंत सक्रिय होईल?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती–** धो-धो मान्सूनच्या प्रतीक्षेत असलेल्या विदर्भ व राज्यातील नागरिकांसाठीही काहीसी निराशाजनक बातमी आहे. सध्या तळकोकणात खोळंबलेला मान्सून पुन्हा सक्रिय होण्यास आठवडा लागण्याची शक्यता आहे. दुसरीकडे विदर्भाला पाऊस देणारी बंगालच्या उपसागरातील शाखासुद्धा स्थिरावली असल्याने इकडेही पावसाला विलंब होण्याचा अंदाज आहे. निरीक्षणानुसार विदर्भात २५ जून ते १ जुलैपर्यंत मान्सून सक्रिय होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे. हवामान विभागाचे माजी अधिकारी माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार विदर्भाला पाऊस देणारी बंगाल उपसागरीय मान्सूनची शाखा ही सध्याच्या पूरक प्रणाली अभावी सध्याच्या आठवड्यात काहीशी स्थिरावून धिम्या गतीने वाटचाल करू शकते. ही शाखाही २५ जून ते १ जुलै दरम्यानच्या आठवड्यात सक्रिय होवून तेथे मान्सूनच्या पावसाची शक्यता जाणवते.दुसरीकडे कोकणापर्यंत ८ जूनलाच धडकलेल्या मान्सूनची गती नंतर मंदावली.

# रविकांत तुपकरांच्या आंदोलनाचा उद्रेक! शेतकऱ्याचा आत्मदहनाचा प्रयत्न

## संतप्त आंदोलकांनी रस्त्यावर फेकला भाजीपाला



***विदर्भ प्रजसत्ताक***
***दि.१७बुलढाणा–*** शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या सरसकट कर्जमुक्तीसाठी सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाने आज तिसऱ्याच दिवशी धोकादायक आणि हिंसक वळण घेतले! जिल्हाभरात आंदोलनाचा वणवा भडकला असतानाच बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एका संतप्त तरुण शेतकऱ्याने अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून आणि झडप घालून ताब्यात घेतल्याने संभाव्य भीषण अनर्थ टळला.

### भाजीपाल्याचा चिखल

आज बुधवारी, दुपारी तीन वाजताच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ड. शर्वरी तुपकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकरी जमले होते. जिल्हाधिकाऱ्यांना सातबाऱ्याचे वाण देण्यासाठी पाच जणांचे शिष्टमंडळ चर्चेसाठी कार्यालयात गेले. यावेळी बाहेर उभ्या असलेल्या क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी आंदोलकांना पोलिसांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य द्वारावरच रोखून धरले. यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी एकाएकी रस्त्यावर दूध, कांदे, टोमॅटो आणि विविध भाजीपाला फेकत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू केली. काही वेळातच जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील परिसर भाजीपाल्याच्या चिखलाने भरून गेला.

### अंगावर डिझेल ओतले

याच गोंधळात गर्दीतून पुढे आलेल्या विठ्ठल खेडेकर (राहणार अंत्री खेडेकर, तालुका चिखली, जिल्हा बुलढाणा ) या तरुण शेतकऱ्याने स्वतःच्या अंगावर डिझेल ओतून घेतले. यामुळे तिथे एकच गोंधळ उडाला. यावेळी आंदोलनस्थळी तैनात पोलिसांनी प्रसंगावधान राखत त्याला तात्काळ ताब्यात घेतले, त्याच्या खिशातील आगपेटी जप्त केली. त्यामुळे संभाव्य भीषण दुर्घटना टळली. या घटनेने आंदोलनस्थळी काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. यानंतर बुलढाणा पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

### आंदोलनाला जहाल वळण

दरम्यान, १५ जुनापासून सुरु झालेल्या रविकांत तुपकर यांच्या अन्नत्याग आंदोलनाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून जिल्हाभरात आंदोलक अधिक आक्रमक होत असल्याचे चित्र आहे. खामगाव येथे काल मध्यरात्री उपविभागीय अधिकारी (एसडीओ) कार्यालय पेटविण्याचा प्रयत्न करण्यात आला.चिखली तालुक्यातील पेठ येथील पुलावर टायर जाळून निषेध व्यक्त करण्यात आला. आज दुपारी जळगाव जामोद येथे शेतकरी तहसील कार्यालयाच्या इमारतीवर चढले, तर चिखली तालुक्यातील उदयनगर येथे आंदोलकांनी थेट पाण्याच्या उंच टाकीवर चढून आंदोलन सुरू केले आहे. त्यामुळे प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली आहे.

### तिसऱ्या दिवशी प्रकृती खालावली

रविकांत तुपकर यांनी सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाचा आज तिसरा दिवस आहे. ‘संपूर्ण कर्जमुक्तीचा निर्णय होईपर्यंत अन्नाचा कणही ग्रहण करणार नाही,’ असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान त्यांच्या प्रकृतीही खालावल्याची माहिती समोर येत आहे. शासनाकडून अद्याप कोणताही ठोस निर्णय होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना तीव्र होत चालली असून आंदोलन दिवसेंदिवस अधिक उग्र स्वरूप धारण करत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आत्मदहनाचा प्रयत्न हा त्या संतापाचा कळस मानला जात असून पुढील काही तासांत आंदोलन आणखी चिघळण्याची चिन्हे आहे.

## संपादकीय ......

# कोण म्हणतो टक्का दिला

*राज्यात सध्या सगळीकडे आंदोलनांचा भडका उडाला आहे. शेतकरी कर्जमाफीसाठी विठूरायाच्या चरणी बसून अन्नत्याग आंदोलन झाले. जिल्ह्याजिल्ह्यात रास्तारोको, चक्काजाम तर कुठे ट्रॅक्टर मोर्चा निघाला. ऐन उन्हाळ्यात विजेचा लपंडाव राज्याच्या राजधानीतही सुरू आहे. नवी मुंबईत महावितरणविरोधात सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनीच मोर्चा काढला. अधिकार्यांवर बांगड्या भिरकावल्या. तर मराठवाडा, विदर्भात स्मार्ट मीटरच्या मेसेजने धुमाकूळ घातला आहे. याविरोधातही लोक रस्त्यावर उतरताना दिसत आहेत. भलेही त्यांचा विरोध मूठभर असेल मात्र लोक रस्त्यावर येत आहेत. कोल्हापूरमध्ये महाराष्ट्रातील ठेकेदारांचे अधिवेशन झाले.*

*गेल्या दशकभरापासून राज्यातील कंत्राटदारदेखील आंदोलनाच्या मोडमध्ये आले आहेत. सरकार ठेकेदारांच्या माध्यमातून विकासकामे तर करून घेत आहे, मात्र त्यांच्या कष्टाच्या कमाईचा मोबदला वेळेवर दिला जात नाही, अशी सध्याची परिस्थिती आहे. याविरोधातच कोल्हापुरातील महाअधिवेशनात ठेकेदारांनी आवाज बुलंद केला. ठेकेदार तथा कंत्राटदारांची प्रतिमा जनमानसात फारशी उजळ नाही. ठेकेदारांचे लागेबांधे सत्ताधार्यांसोबत विरोधातील नेत्यांसोबतही तेवढेच अर्थपूर्ण असल्यामुळे त्यांच्या रुदालीला सामान्य लोक फार गांभीर्याने पाहात नाही. गेल्या दशकभरापासून सत्तेसोबत साटंलोटं असलेल्या ठेकेदारांनाही आता रस्त्यावर येण्याची वेळ आली आहे. कित्येक वर्षांपासून ठेकेदारांची देयके सरकारने थकवली आहेत. यामुळे कधीकाळी मंत्री, आमदारांच्या मांडीला मांडी लावून बसणारे आता सरकारविरोधात बोलायला लागले आहेत. आता सरकारविरोधात बोललंच पाहिजे, नाही तर आपली मुलं उद्या रस्त्यावर येतील ही भीती त्यांना सतावत आहे.*

*२०२४ मध्ये सत्तारुढ झालेल्या सरकारला आता दीड वर्षे होत आली आहे. अधिवेशनामध्ये आणि मंत्रिमंडळ बैठकीत सरकारकडून आश्वासनांचा पाऊस पाडला जातो. प्रत्यक्षात सरकारची गंगाजळी रिकामी असल्याचे कंत्राटदारांच्या बोंबांवरून लक्षात येत आहे. सरकारच्या सार्वजनिक बांधकाम, जलजीवन मिशन व महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, पर्यटन विकास महामंडळ, नगरविकास विभाग विशेष निधी कामे, जलसंपदा विभाग आणि जिल्हा नियोजन समिती व इतर विभागांची हजारो कोटींची बिलं थकित आहेत. ही बिलं मंजूर करण्यासाठी ठेकेदारांना मोठ्या प्रमाणावर कमिशन द्यावे लागत असल्याचा गौप्यस्फोट कोल्हापुरातील अधिवेशनात ठेकेदारांनी केला. त्यांनी आमदार, खासदार, सरकारी अधिकारी यांना किती-किती टक्केवारी द्यावी लागते आणि त्यानंतर पुन्हा काम चांगले झाले नाही म्हणून सत्ताधार्यांच्या शिव्याही खाव्या लागतात या दुष्टचक्राची उजळणी केली.*

*राज्यातील ठेकेदारांची परिस्थिती एकूणच गंभीर झालेली आहे. याआधीच्या अधिवेशनांमध्ये विरोधकांनी सरकारकडे ठेकेदारांची बिलं देण्यासाठी पैसे नसल्याचे सत्य उघड केले, मात्र त्यावर पद्धतशीर पडदा मंत्र्यांकडून आणि मुख्यमंत्र्यांकडून टाकण्यात आला. कोंबडं कितीही झाकलं तरी सूर्य उगवल्याशिवाय राहात नाही, तसे नागपूर आणि सांगलीच्या ठेकेदारांनी केलेल्या आत्महत्यांमुळे राज्यातील ठेकेदारांची स्थिती समोर आली. मुख्यमंत्र्यांच्या गृहजिल्ह्यातील पी. व्ही. वर्मा या कंत्राटदाराने गेल्या वर्षी आत्महत्या केली. वर्मा यांनी सार्वजनिक बांधकाम विभागात कोट्यवधींची कामे केली. त्यांची ४० कोटींहून अधिकची सरकारी बिलं थकल्यामुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले. वर्मा हे काही नवीन ठेकेदार नव्हते. साठी पार केलेल्या या कंत्राटदाराचे दक्षिणेतील अभिनेता प्रभाससोबत कौटुंबिक नाते होते. गेल्या चार दशकांपासून ते या व्यवसायात होते. तरीही ठेकेदाराला आत्महत्या करण्याची वेळ येत असेल तर त्यांची आर्थिक स्थिती किती गंभीर झाली याचा अंदाज येतो. सांगलीमध्ये हर्षल पाटील या तरुणाने नोकरीपेक्षा उद्योग करावा या उद्देशाने सरकारी कामे करण्यास सुरुवात केली. या तरुण कंत्राटदाराचे सरकारकडे १ कोटी ४० लाख रुपये थकले.*

*सरकारकडून पैसे मिळण्याची कोणतीच आशा दिसत नसल्यामुळे या तरुण अभियंत्याने मृत्यूला कवटाळले. सरकारच्या भ्रष्ट यंत्रणेचा हा तरुण कंत्राटदार बळी ठरला. शासनाकडून पैसे काढायचे तर अधिकार्यांना टक्केवारी दिल्याशिवाय बिल मंजूर होत नाही. त्यातून पुन्हा आमदार, खासदार यांची टक्केवारी वेगळी. या सर्व भ्रष्टाचाराला कंटाळून त्याने आत्महत्या केल्याचे आरोप गेल्यावर्षी विरोधी पक्षनेत्यांनी सभागृहात केले. मात्र सरकार ढिम्म आहे. ठाणे पालिकेतील टक्केवारी नंदलाल समितीने उघड केली होती. ४१ टक्क्यांपर्यंत कमिशन उपटले जात होते. आजही या परिस्थितीत बदल झालेला नाही. दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख नेहमी म्हणत, 'स्टँडिंगमधील अंडरस्टँडिंग' सर्वांना माहीत आहे. यावरून राज्यातील टक्केवारीचे गणित कळायला सोपे होते.*

*नेमेचि येतो मग पावसाळा याप्रमाणे पुढील आठवड्यात राज्याच्या विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू होणार आहे. तोपर्यंत विधान परिषदेच्या बिनविरोध शिवाय राहिलेल्या निवडणुकाही पार पडतील. त्यातही सरकारचे आमदारच अधिक असणार असेच सध्याचे वातावरण आहे. कारण ज्या जिल्ह्यात सध्या लोक पाण्यासाठी वणवण भटकत आहेत, त्यांचे नगरसेवक गोव्यात पुल पार्टी आणि समुद्रात मौजमस्ती करण्यात व्यग्र आहेत. या नगरसेवकांचा खर्च कोण करत आहे, हा प्रश्न तसा अनाठायीच. कारण राज्यात सध्या विधान परिषदेच्या निवडणुका आहेत आणि उमेदवारी अर्ज मागे घेतलेले विरोधी पक्षाचे उमेदवार म्हणतात की आम्हाला मतदार भेटत नाहीत. ते सध्या तीर्थयात्रेला गेले आहेत. या कडक उन्हाळ्यात नगरसेवकांची तीर्थयात्रा कुठे सुरू आहे, हे सध्या लोक पाहात आहेत. असे लोकप्रतिनिधी आणि राज्यकर्ते ज्या जनतेला आणि ठेकेदारांना मिळाले असतील त्यांचं कोण भलं करणार? पण सरकारी कंत्राटदारांनी आता आवाज बुलंद केला आहे. टक्केवारीने छळलेल्या या वर्गाला आता जाग आली, हेही कमी नाही.*

# गावठाणातील जीवंत डीपीमुळे अपघाताचा धोका

## डीपी स्थलांतरित करण्याची ग्रामस्थांची मागणी

### महावितरणला निवेदन; जीवितहानी झाल्यास प्रशासन जबाबदार राहणार असल्याचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७तिवसा** – ग्रामपंचायत अनकवाडी अंतर्गत येणाऱ्या मौजा रघुनाथपूर व मौजा मालधूर येथील गावठाण परिसरात उभारण्यात आलेल्या जीवंत वीज वितरण डीपीमुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला असून सदर डीपी तात्काळ सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. याबाबतचे निवेदन माननीय उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (महावितरण), तिवसा यांना देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, रघुनाथपूर व मालधुर गावातील गावठाण परिसरात असलेल्या डीपीच्या अगदी जवळ रहिवासी घरे, सार्वजनिक रस्ते तसेच पाणीपुरवठ्याची साधने आहेत. या परिसरातून दररोज लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच गुरे-वासरे यांची सतत ये-जा सुरू असते. त्यामुळे कोणत्याही



क्षणी विद्युत अपघात होऊन मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विशेष म्हणजे, या गंभीर समस्येबाबत महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना अनेकवेळा तोंडी स्वरूपात माहिती देण्यात आली होती. मात्र, अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून डीपी स्थलांतरित करण्याची मागणी अधिक तीव्र झाली आहे.


गावठाणातील जीवंत डीपी ही नागरिकांच्या जीवाशी खेळणारी बाब आहे. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात. अन्यथा भविष्यात कोणतीही दुर्घटना अथवा जीवितहानी झाल्यास त्यास संपूर्णपणे महावितरण प्रशासन जबाबदार राहील, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

यावेळी जसबीर ठाकूर, सरपंच सूरज धुमणखेळे, आशिष बायस्कर, कुणाल बायस्कर, गुणवंत मुंद्रे, अविनाश बायस्कर, गुड्डू बायस्कर यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# मोर्शीत देशी दारूचा साठा जप्त

## स्विपर कॉलनीतील घरावर पोलिसांची धाड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मोर्शी,** अवैध देशी दारूची साठवणूक करून विक्रीसाठी ठेवलेल्या २४८ बाटल्या मोर्शी पोलिसांनी जप्त केल्या आहेत. या कारवाईत सुमारे १० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून एका आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या अवैध धंद्यांविरोधातील मोहिमेअंतर्गत मोर्शी पोलिसांना स्विपर कॉलनी परिसरातील एका घरात देशी दारूचा साठा



असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण व त्यांच्या पथकाने सोमवारी धाड टाकली.घराची झडती घेत असताना एका खोलीत पोत्यांमागे लपवून ठेवलेल्या २४८ देशी दारूच्या बाटल्या आढळून आल्या. पोलिसांनी पंचांसमक्ष साठा जप्त केला. याप्रकरणी दिलबारसिंग मोतीसिंग बावरी (वय ५२, रा. स्विपर कॉलनी, मोर्शी) याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५(ई) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी, मोर्शी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण, छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर व अथर्व कोहळे यांनी सहभाग घेतला.

# धामणगाव शहरात पावसाचा कहर

## निंबाचे झाड कोसळून विद्युत खांब तुटला, वीजपुरवठा खंडित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७धा.रेल्वे**
धामणगाव शहरात आज १७ जून बुधवारी सायंकाळी झालेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. सुमारे एक ते दीड तास कोसळलेल्या जोरदार पावसादरम्यान भागचंद नगर-धावणेवाडी मार्गावरील एक मोठे निंबाचे झाड विद्युत खांबावर कोसळल्याने खांब तुटून खाली पडला. या घटनेमुळे परिसरातील वाहतूक काही काळासाठी पूर्णपणे ठप्प झाली. झाड कोसळल्यामुळे विद्युत खांबासह



वीजवाहक तारांचे मोठे नुकसान झाले. परिणामी शहरातील अनेक भागांचा वीजपुरवठा खंडित झाला. अचानक वीजपुरवठा बंद झाल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. घटनेची माहिती मिळताच महावितरणचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. रस्त्यावर पडलेले झाड हटविणे, तुटलेला खांब बदलणे आणि वीजवाहिन्यांची दुरुस्ती करण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले. दरम्यान, रस्त्यावर वाहतूक कोंडी निर्माण झाल्याने वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागला.याबाबत माहिती देताना सहाय्यक अभियंता आकाश बेनोलकर यांनी सांगितले की, तुटलेला विद्युत खांब लवकरात लवकर दुरुस्त करण्यात येणार असून नवीन तारा टाकून वीजवाहिनी पूर्ववत करण्याचे काम सुरू आहे. नागरिकांचा वीजपुरवठा शक्य तितक्या लवकर सुरळीत करण्यात येईल.सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मुसळधार पावसामुळे शहरातील नागरिकांना काही काळ मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# एफडीएची धास्ती, बहुतांश पानटपर्या बंद, पुडी साठी होत आहे वांदे

## मुंढे पॅटर्नचा धसका




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**
कडक शिस्त, धाडसी निर्णयक्षमता आणि भ्रष्टाचाराविरोधातील आक्रमक भूमिकेमुळे ओळखले जाणारे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाच्या आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारताच राज्यभर धडक कारवाईचा सपाटा लावला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या तपासणी मोहिमेमुळे अनेक व्यापारी, खाद्य व्यवसायिक आणि भेसळखोरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या कारवाईची दहशत एवढी वाढली आहे की, गुटखा, पानमसाल्यांची सर्रास विक्री करणार्या बहुतांश पानटपर्या बंद आहेत आणि ज्या उघड्या आहेत त्यांनी विकणे बंद केले आहे.

अमरावती जिल्ह्यातल्या प्रत्येक तालुक्यात व गावात गुटखा, पानमसाला, संगुधी तंबाखू या सारखे प्रतिबंधित साहित्य मोठ्या प्रमाणात विकले जाते. जिल्ह्यातल्या पानटपरी चालकांचा एक प्रकारे हाच मुख्य व्यवसाय आहे. गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात एफडीएचे अधिकारी सर्वत्र तपासणी करीत आहे. आपल्याही पानठेल्याची चौकशी होईल धास्तीने सर्वच घाबरले आहे. तिवसा शहरातील आठवडी बाजार परिसर, पेट्रोल पंप चौक, बसस्थानक चौक तसेच सॉफ्ट कॉर्नर चौक परिसरातील बहुतांश पानटपर्या आणि काही भागातील लहान व्यावसायिकांची दुकाने बंद असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे तालुक्यातील अनेक गावांमधील पानटपरी चालकांनीही संभाव्य कारवाईच्या भीतीने आपले व्यवसाय तात्पुरते बंद ठेवणे पसंत केले आहे. हीच स्थिती अन्य तालुक्यांमध्ये व अमरावती शहरात आहे. एफडीएच्या वाढत्या हालचालींमुळे अन्नपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता, परवानग्या आणि नियमांचे पालन याकडे प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केल्याची चर्चा व्यापारी वर्तुळात सुरू आहे. त्यामुळे नियमांचे पालन न करणारे व्यावसायिक सध्या सावध भूमिका घेताना दिसत आहेत.

### अनेकांना कारवाईची धास्ती

अनेक ठिकाणी स्वच्छता, परवाने आणि अन्नसुरक्षा नियमांची पडताळणी सुरू आहे. केली आहे. तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार होणार्या धडक कारवाईचा धसका घेत अनेक छोटे-मोठे व्यवसायिक, पानटपर्या चालकांनी आपली दुकाने बंद ठेवण्यातच धन्यता मानल्याचे चित्र दिसत आहे. विशेषतः भेसळयुक्त पदार्थ विक्री करणारे तसेच नियमांचे पालन न करता व्यवसाय करणारे व्यापारी अधिकच धास्तावले असून संभाव्य कारवाई टाळण्यासाठी त्यांनी तात्पुरता व्यवसाय बंद ठेवण्याचा मार्ग स्वीकारल्याची चर्चा बाजारपेठेत रंगत आहे.

# नागरिकांना स्मार्ट मीटरची सक्ती करू नये

## उपकार्यकारी अभियंता यांना भाजपच्या वतीने निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७तिवसा**
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी प्रत्येकाला स्मार्ट मीटर बसविण्याचा तगादा लावत आहे. त्यामुळे नागरिक चांगलेच त्रस्त झाले आहेत. तथापि, पाहिजे त्याला स्मार्ट मीटर द्यावे, शहरासह तालुक्यात कुणालाही स्मार्ट मीटरची सक्ती करू नये, अशा मागणीचे निवेदन तिवसा शहर भाजपच्या वतीने उपकार्यकारी अभियंता यांना देण्यात आले. सध्या सुरू असलेल्या स्मार्ट मीटर बसविण्याच्या प्रक्रियेबाबत नागरिकांमध्ये अनेक शंका व नाराजी निर्माण झाली आहे. स्मार्ट मीटरमुळे वीजबिलामध्ये वाढ होण्याची भीती, प्रीपेड पद्धतीमुळे सर्वसामान्य ग्राहकांवर येणारा आर्थिक ताण तसेच मीटरच्या अचूकतेबाबत नागरिकांमध्ये संभ्रम आहे.



याशिवाय या योजनेबाबत पुरेशी जनजागृती व ग्राहकांचे मत जाणून न घेता अंमलबजावणी करण्यात येत असल्याची भावना निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. तसेच निवेदनामध्ये स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया तत्काळ स्थगित करावी, ग्राहकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी सार्वजनिक बैठका आयोजित कराव्यात, स्मार्ट मीटरच्या वापराबाबत संपूर्ण माहिती व पारदर्शकता ठेवावी, नागरिकांची संमती घेतल्याशिवाय स्मार्ट मीटर बसवू नये, सर्वसामान्य ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करावे आदी मागण्या निवेदनातून करण्यात आल्या. यावेळी शहर मंडळ अध्यक्ष अजय गुल्हाने, तेजस्वीनी वानखडे, राजू ठाकरे, नंदकिशोर देशमुख, सुधीर वानखडे, सुमित अनासाने, अंकुश देशमुख, मयूर वानखडे, भूषण देशमुख, अभय वानखडे, प्रतीक नंदनवार आदी उपस्थित होते.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# उज्ज्वला लाभार्थ्यांना धक्का; वर्षाला केवळ चारच सिलिंडरवर अनुदान

## ग्रामीण भागात पुन्हा पेटल्या चुलीमहागाई, अनुदानातील कपात आणि गॅस टंचाईमुळे लाखो कुटुंबांचे बजेट कोलमडले; महिलांची सरपणासाठी पुन्हा वणवण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

ग्रामीण भागातील महिलांना धूरमुक्त स्वयंपाकाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री उज्वला योजनेला बदलत्या नियमांचा आणि वाढत्या महागाईचा फटका बसत आहे. उज्वला योजनेअंतर्गत मिळणाऱ्या सवलतीच्या एलपीजी गॅस सिलिंडरची संख्या कमी झाल्याने लाभार्थी कुटुंबांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. वर्षभरात केवळ चार सिलिंडरवरच अनुदान मिळणार असल्याने अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडले आहे.उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना प्रत्येक सिलिंडरमागे ३०० रुपयांचे अनुदान थेट बँक खात्यात जमा केले जाते. मात्र, आता वर्षाला फक्त चार सिलिंडरपर्यंतच हे अनुदान मर्यादित राहणार आहे. चार सिलिंडर संपल्यानंतर पुढील सिलिंडर बाजारभावाने खरेदी करावा लागणार असल्याने ग्रामीण कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत




आहे.दरम्यान, गॅस सिलिंडरच्या वाढत्या किमतींसोबतच ग्रामीण भागात पुरवठ्यातील अडचणीही गंभीर बनल्या आहेत. अनेक गावांमध्ये गॅस एजन्सींची वाहने वेळेवर पोहोचत नसल्याने ग्राहकांना सिलिंडरसाठी ४५ ते ५० दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे अनेक कुटुंबांनी गॅस शेगडीचा वापर कमी करून पुन्हा पारंपरिक चुलींकडे मोर्चा वळवला आहे.जिल्ह्यातील सुमारे एक लाखांहून अधिक उज्वला लाभार्थी कुटुंबांनी वाढत्या खर्चामुळे गॅसचा वापर कमी केल्याचे चित्र आहे. परिणामी महिलांना पुन्हा सरपण गोळा करण्यासाठी वणवण करावी लागत असून, धूरमुक्त स्वयंपाकघराचे उद्दिष्ट धोक्यात आल्याची भावना व्यक्त होत आहे.ग्रामीण भागातील लाभार्थ्यांनी अनुदानित सिलिंडरची संख्या वाढविण्याबरोबरच नियमित गॅस पुरवठा सुनिश्चित करण्याची मागणी केली आहे. महागाईच्या काळात घेतलेल्या या निर्णयामुळे उज्वला योजनेच्या प्रभावावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# खाद्यतेलाच्या पॅक साइजवर केंद्राचा लगाम आता फक्त प्रमाणित आकारमानांतच विक्री

## ९००, ९१०, ९५० मिलीच्या पॅकमुळे होणारा गोंधळ संपणार

## ग्राहकांना किमतींची तुलना करणे होणार सोपे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

खाद्यतेलाच्या पॅकिंगमध्ये असलेल्या विविध आकारमानांमुळे ग्राहकांची होणारी दिशाभूल रोखण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता प्रमुख खाद्यतेलांची विक्री केवळ निश्चित केलेल्या नऊ प्रमाणित (स्टँडर्ड) पॅक आकारमानांतच करता येणार असून, उत्पादक, पॅकर्स आणि आयातदारांना नवीन नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे.ग्राहक व्यवहार विभागाने कायदेशीर मोजमाप (लीगल मेट्रोलॉजी) नियमांतर्गत सुधारित कार्यपद्धती (एसओपी) लागू केली




आहे. सध्या बाजारात ८५०, ८७०, ९००, ९१०, ९५० मिली तसेच इतर विविध आकारांचे पॅक उपलब्ध असल्याने ग्राहकांना प्रतिलिटर किंमत समजणे आणि वेगवेगळ्या कंपन्यांच्या उत्पादनांची तुलना करणे अवघड जात होते. नव्या नियमांमुळे हा गोंधळ दूर होण्याची अपेक्षा आहे.नवीन तरतुदीनुसार, पॅकवरील तेलाचे प्रमाण लिटरमध्ये नमूद केल्यास त्यासमोरील समतुल्य वजन (किलो किंवा ग्रॅम) देखील त्याच आकाराच्या अक्षरांत छापणे बंधनकारक राहणार आहे. त्यामुळे ग्राहकांना उत्पादनाचे अचूक प्रमाण आणि किंमत सहज समजेल.तथापि, २०० मिली किंवा २०० ग्रॅमपेक्षा कमी क्षमतेच्या छोट्या पॅकना या मानकीकरणातून सूट देण्यात आली आहे. काही दुर्मीळ किंवा मर्यादित वापरातील खाद्यतेलांनाही सवलत देण्यात आली आहे.सरकारच्या या निर्णयामुळे खरेदीतील पारदर्शकता वाढेल, दिशाभूल करणाऱ्या पॅक आकारमानांना आळा बसेल आणि ग्राहकांना योग्य किमतीत खरेदी करणे सोपे होईल. तसेच विविध ब्रँड्समधील स्पर्धा अधिक न्याय्य आणि ग्राहकहिताची होण्यास मदत मिळणार आहे. खाद्यतेलाच्या प्रत्येक पॅकवर निव्वळ प्रमाण (नेट क्वांटिटी) स्पष्टपणे नमूद करणे बंधनकारक राहणार असल्याने ग्राहकांना वस्तूचे अचूक प्रमाण समजण्यासही मदत होणार आहे.

# बिल देण्यास टाळाटाळ कृषी विभागाची राहणार नजर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**



### बिलामध्ये 'या' बाबी तपासून घ्या!

कृषी केंद्र चालकाकडून बिल घेताना ते केवळ कागदाचा तुकडा नसून अधिकृत बिल आहे याची खात्री करा. बिलामध्ये विक्रेत्याचे (कृषी केंद्राचे) नाव आणि त्याचा वैध परवाना क्रमांक, बियाणे/खताच्या कंपनीचे नाव आणि त्याचा बॅच क्रमांक, वस्तूची अंतिम तारीख, प्रमाण (वजन/नग) आणि निश्चित केलेला दर. खरेदी केल्याची अचूक तारीख आणि विक्रेत्याची स्वाक्षरी असणे गरजेचे आहे. अनेकजण कच्चे बिल देतात. मात्र या बिलाच्या आधारावर कोणतेही क्लेम करता येत नाही.

मृग नक्षत्राच्या आगमना सोबतच संपूर्ण अमरावती जिल्ह्यात खरीप हंगामाची लगबग सुरू झाली आहे. शेतकरी सध्या बी-बियाणे, रासायनिक खते आणि कीटकनाशके (कृषी निविष्ठा) खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत गर्दी करत आहेत. मात्र, ही खरेदी करताना शेतकऱ्यांनी अधिकृत कृषी केंद्र चालकाकडून 'पक्के बिल' घेणे अत्यंत आवश्यक आहे.अनेकदा पीक न उगवणे, बोगस बियाणे निघणे अशा तक्रारी समोर येतात; पण पक्के बिल नसल्याने शेतकऱ्यांना कायदेशीर लढाई लढताना अडचणी येतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी आणि बोगस निविष्ठांना आळा घालण्यासाठी खरेदीच्या वेळी पक्के बिल घेणे बंधनकारक करण्यात आले असून, बिल नाकारणाऱ्या दुकानदारांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. हंगामाला सुरुवात होत असल्याने शेतकरी कामाला लागला आहे. अशावेळेस जागरुक राहून बिल घेणे गरजेचे आहे.

# शालेय गणवेश खरेदीसाठी ६० रुपये भरायचे कुणी ?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**स्थानिक स्वराज्य संस्था व शासकीय



शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत गणवेश उपलब्ध करून दिले जातात. गणवेश खरेदीसाठी शाळांना केवळ २४० रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. गणवेशाची किंमत ३०० रुपये आहे. उर्वरित ६० रुपये भरणार कोण असा, प्रश्न शाळा समितीचे पदाधिकारी मुख्याध्यापक उपस्थित करीत आहेत. व पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा अभियान अंतर्गत दोन गणवेश, सॉक्स व बूट उपलब्ध करून दिले जातात. एका गणवेशाचे ३०० रुपये असे एकूण दोन गणवेशाचे ६०० रुपये शाळांना मिळणे अपेक्षित होते. मात्र सर्व शिक्षा अभियानाने केवळ २४० रुपये उपलब्ध करून दिले आहेत. विदर्भातील शाळा सुरू होण्यास केवळ १५ दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. त्यामुळे शाळांनी गणवेश खरेदीची तयारी सुरू केली आहे. मात्र, ६० रुपये भरणार कोण? असा प्रश्न आहे. तोपर्यंत दुकानदार, शिलाई करणारे बचत गट पैसे उधार ठेवणार काय?असा प्रश्न आहे.

### कापड घ्यायचे की शिलाईचे पैसे द्यायचे, दुकानदार उधार ठेवणार काय ?

शासनाच्या निर्देशानुसार शाळांनी गणवेशाचे कापड खरेदी करून ते स्थानिक महिला बचत गटाच्या सदस्यांकडून शिवून घ्यायचे आहे. मात्र, शासनाकडून प्राप्त झालेल्या पैशातून कापड खरेदी करायचे की शिलाईचे पैसे द्यायचे असा प्रश्न मुख्याध्यापकांसमोर निर्माण झाला आहे. दुकानदार कापडाचे पैसे उधार ठेवणार काय? असा प्रश्न आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तके व गणवेश मिळणे अपेक्षित असते. परंतु यावर्षी दोन्ही वस्तू एकाचवेळी पहिल्या दिवशी मिळणार काय असा प्रश्न आहे.

### शूज व सॉक्सचा अद्याप पत्ताच नाही

शासनाकडून विद्यार्थ्यांना एक जोड शूज व दोन जोड सॉक्सही दिले जातात. मात्र, अद्याप शूज व सॉक्सबाबत काहीच निर्देश आलेले नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना जुनेच बूट घालून शाळेत जावे लागणार आहे. दुसऱ्या प्रतीक्षा कायम आहेच. गणवेशाचेही पैसे कधी मिळतील याची प्रतीक्षा कायम आहेच.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत वासरू गंभीर जखमी

## वारसा संस्थेच्या कार्यकर्त्यांची जीव वाचविण्यासाठी धडपड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मोर्शी**शहरातील बसस्टॉप परिसरात रात्री अज्ञात वाहनाच्या धडकेत एका वासराला गंभीर दुखापत झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. अपघातात वासराचा पाय तुटल्याने त्याला उभे राहणेही अशक्य झाले होते. वेळेत मदत मिळाल्याने त्याचा जीव वाचविण्यात यश आले. घटनेची माहिती देवा समरीत यांनी वारसा संस्थेच्या हेल्पलाइनवर दिल्यानंतर संस्थेचे नितीन चिखले, अभी व्यवहारे, मोहित अपकाजे व यश भागे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पाहणी केली असता वासराच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याचे आणि तो पूर्णपणे तुटल्याचे निदर्शनास आले. कार्यकर्त्यांनी घटनास्थळी च प्राथमिक उपचार करून वासरा ला तातडीने उपचार केंद्रात हलविण्याचा निर्णय घेतला. मात्र, वारसा संस्थेकडे प्राण्यांसाठी रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने मोठी अडचण निर्माण झाली. अशा परिस्थितीत नितीन चिखले यांनी सामाजिक बांधीलकी जपत स्वतःच्या वाहनातून जखमी वासराला गोरक्षण केंद्रात पोहोचविले. सध्या वारसा संस्थेच्या माध्यमातून त्याच्यावर उपचार सुरू असून त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.या घटनेनंतर शहरात जखमी व आजारी भटक्या जनावरांसाठी स्वतंत्र निमल म्ब्युलन्सची आवश्यकता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. अपघातग्रस्त जनावरांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी मोर्शी नगरपरिषदेमार्फत स्वतंत्र प्राणी रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात यावी, अशी मागणी वारसा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

# 'किलकारी' आरोग्य योजनेचा लाभ

## गर्भवती महिलांना मोबाईलवरून मिळणार आरोग्य मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

जिल्ह्यात केंद्र सरकारच्या 'किलकारी मोबाईल आरोग्य योजने'ची अंमलबजावणी सुरू झाली असून गर्भवती महिला आणि एक वर्षापर्यंतच्या बालकांच्या पालकांना मोबाईलवरून मोफत आरोग्यविषयक मार्गदर्शन दिले जाणार आहे.

गर्भावस्थेच्या चौथ्या महिन्यापासून ते बाळ एक वर्षाचे होईपर्यंत लाभार्थ्यांना दर आठवड्याला रेकॉर्डेड ऑडिओ कॉलद्वारे आरोग्य सल्ले मिळतील.या योजनेअंतर्गत गर्भधारणा, प्रसूती, स्तनपान, बालसंगोपन, लसीकरण, पोषण आणि कुटुंब नियोजन याबाबतची माहिती स्थानिक भाषेत उपलब्ध करून दिली जाणार आहे.




गरोदरपणाच्या चौथ्या महिन्यापासून बाळ एक वर्षाचे होईपर्यंत एकूण ७२ ऑडिओ कॉल लाभार्थ्यांच्या मोबाईलवर येतील.योजनेचा लाभ घेण्यासाठी आशा सेविका किंवा जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत आरसीएच पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीनंतर लाभार्थ्यांना थेट मोबाईलवर कॉल येण्यास सुरुवात होते.

कॉल चुकल्यास टोल-फ्री क्रमांकावरून संदेश पुन्हा ऐकण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी सुभाष ढोले यांनी सांगितले की, जिल्ह्यात या योजनेला गरोदर मातांचा चांगला प्रतिसाद मिळत असून लसीकरण, आरोग्य तपासण्या आणि माता-बालकांच्या आरोग्यविषयक माहितीसाठी ही योजना उपयुक्त ठरत आहे. त्यामुळे मातांना योग्य वेळी आवश्यक सल्ला मिळून आरोग्यविषयक अडचणी कमी होण्यास मदत होत आहे.

### आरसीएच पोर्टलवर नोंदणी करावी लागणार

या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांना आशासेविका किंवा जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात संपर्क साधून आरसीएच पोर्टलवर त्याची नोंद करावी लागते. त्यानंतर मोबाईलवर थेट कॉल येतो.

# पहिल्याच पावसात शिरजगावातील मुख्य रस्त्याचे हाल

## बाजार चौकातील मुख्य रस्त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांचा जीव टांगणीवर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७शिरजगाव** मोझरी ..तिवसा तालुक्यातील शिरजगाव मोझरी येथे पहिल्याच पावसात रस्त्यावर एक फूट एवढे पाण्याचे डबके अनेक ठिकाणीच असलेले आहे ग्रामपंचायत प्रशासनाच्या अरे राईमुळे शिरजगावातील नागरिक विद्यार्थी गर्भवती माता वयोवृद्ध नागरी व वाहन चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे गेल्या दोन वर्षापासून गावातील नागरिकांनी ग्रामपंचायत सरपंच ग्रामसेवक यांना वारंवार कळवले असता वळवाघुवीचे उत्तर देऊन तो रस्ता ग्रामपंचायत यांच्या हद्दीत येत नाही असे सांगून गावातील नागरिकांना चूक बसवले जातात दोन वर्षा आधी ग्रामपंचायतीने शिरजगावातील मुख्य रस्ता हा जेसीपीच्या सहाय्याने पाईप टाकण्याकरिता सुमारे २०० मीटर रस्ता पूर्णपणे उखरला असता तो आम्ही दुरुस्त करू असे आश्वासन दिले होते मात्र दोन वर्ष उलटणही तो मुख्य रस्ता जसाच्या तसाच असल्याचे चित्र दिसत आहे ग्रामपंचायत प्रशासन म्हणतात की तो रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मालकीचा आहे मात्र ग्रामपंचायत यांनी पूर्ण पणे उखरला उखरलेला मुख्य रस्ता ग्रामपंचायत प्रशासन दुरुस्त करत नाहीआणि गावातील नागरिकांनी उखडलेल्या दोन फूट रस्ता यांच्याकरिता ग्रामपंचायत प्रशासन हे नागरिकांकडून १००० रुपये सक्तीने वसूल करतात मात्र ग्रामपंचायतीने खोदलेला रस्ता कोण दुरुस्त करणार असा प्रश्न गावकऱ्यांनी केला आहे.

# विहिरीत पडलेल्या बैलाचे ग्रामस्थांनी वाचविले प्राण

## बचाव कार्यादरम्यान काही नागरिक जखमी, स्वतःच्या जीवाची पर्वा न करता नागरिकांनी मुक्या जनावराचे प्राण वाचविले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७तळेगाव ठाकूर**

तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर येथे मंगळवारी (दि. १६ जून २०२६) दुपारी ३ वाजताच्या सुमारास एका शेतकऱ्याच्या मालकीचा बैल विहिरीत पडल्याची घटना घडली. ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे आणि अथक प्रयत्नांमुळे तब्बल २ तासांच्या बचावकार्यानंतर बैलाला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले.

प्राप्त माहितीनुसार, उमेश उमप यांचे शेत वाहितदार शेतकरी दादाराव घोरमाडे यांच्या मालकीची बैलजोडी रखवालदार परेश उईके हे विहिरीजवळील टाकीवर पाणी पिण्यासाठी घेऊन गेले होते. त्यावेळी अचानक एका बैलाने दुसऱ्या बैलाला धडक दिल्याने एक बैल तोल जाऊन विहिरीत पडला.

घटनेची माहिती मिळताच रखवालदार परेश उईके यांनी तात्काळ दादाराव घोरमाडे यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर घोरमाडे यांनी गावातील नागरिकांना सोबत घेऊन घटनास्थळी धाव घेतली. गावातील पोलीस पाटील किशोर दिवे यांनी तत्काळ ट्रॅक्टरची व्यवस्था करून मदतीचा हात पुढे केला.

बचावकार्यासाठी महेश लांजेवार, मारोती निमकर, विशाल मेश्राम, परेश उईके आणि डुबा थोरात यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून विहिरीत उतरून प्रयत्न सुरू केले. विहिरीतील बैलाला दोरखंडाने सुरक्षित बांधून ट्रॅक्टरच्या सहाय्याने बाहेर काढण्याचे काम करण्यात आले. सुमारे २ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर बैलाला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले.



या बचावकार्यात विहिरीत उतरलेल्या काही नागरिकांना गंभीर दुखापती झाल्या. त्यांच्यावर तळेगाव ठाकूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आले. मात्र, त्यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता एका मुक्या जनावराचे प्राण वाचविण्यासाठी धाडस दाखविले.

विहिरीत पडलेल्या बैलाला किरकोळ दुखापत झाली असून पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल महल्ले यांनी शेतात जाऊन जखमी बैलावर उपचार केले. सध्या बैलाची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.यावेळी विठ्ठल मेश्राम, सुरेश नाथे, प्रवीण बहादूरकर, सुनिल घोरमाडे आणि बाबाराव तापकीरे यांनीही बचावकार्यात मोलाचे सहकार्य केले.

खरीप हंगामाच्या तोंडावर बैलासारखे महत्त्वाचे शेतीचे साधन वाचल्याने शेतकरी दादाराव घोरमाडे यांचे मोठे संकट टळले असून ग्रामस्थांच्या एकजुटीचे, सामाजिक बांधिलकीचे व धाडसी वृत्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे.


# पसंतीच्या उमेदवाराला ‘१’ क्रमांकाचे मत दिले तरी मतदान राहणार ग्राह्य

## अमरावती उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांची माहिती

### दुसरे मत देणे सक्तीचे नाही., अफवांना ब्रेक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती** ४५३ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधी मतदारांनी कोणत्याही प्रकारचा संभ्रम मनात न बाळगता, निर्भयपणे व नियमानुसार आपल्या पसंतीचा हक्क बजावावाअमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या गुरुवार दिनांक १८ जून २०२६ रोजी होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाच्या पद्धतीबाबत मतदारांमध्ये असलेला संभ्रम निवडणूक विभागाने पूर्णपणे दूर केला आहे. बॅलेट पेपरवर मतदारांनी आपल्या पसंतीच्या कोणत्याही एका उमेदवाराला पहिल्या क्रमांकाचे (’१’) मत दिले आणि उर्वरित दोन उमेदवारांना मते दिली नाहीत, तरीही ते मतदान पूर्णपणे वैध आणि ग्राह्य धरले जाईल, असे जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. या प्रतिष्ठापूर्ण निवडणुकीत एकूण ४५३ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यंदाच्या रणसंग्रामात त्रिकोणी लढत रंगत असून मुख्य उमेदवारांचे चित्र स्पष्ट झाले आहे. रिंगणातील या तिन्ही उमेदवारांनी विजयासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरु केली असली, तरी मतदारसंघातील सध्यस्थीती आणि संख्याबळ पाहता भाजपचे पारडे जड मानल्या जात आहे. मतदाराला पसंतीच्या उमेदवाराला क्रमांक देताना राज्य निवडणूक आयोगाने



निश्चित केलेला मार्कर पेन वापरावा लागेल. दुसरा कुठलाही पेन वापरात येणार नाही, ही बाब स्पष्ट करण्यात आली आहे. ही निवडणूक मतपत्रिकेद्वारे होणार असल्याने पसंतीक्रम नोंदवणे आवश्यक असते. मात्र, काही दिवसांपासून तिन्ही उमेदवारांना मते देणे सक्तीचे आहे, अन्यथा मतपत्रिका बाद ठरेल ’, असा संभ्रम पसरवला जात होता. या अफवेला ब्रेक लावत मतदाराने केवळ एकाच उमेदवाराला पहिल्या क्रमांकाचे मत दिले तरी ते बॅलेट ग्राह्य मानले जाईल, असे निवडणूक आयोगाच्या नियमावलीनुसार रिंगणातील सर्वच उमेदवारांना मत देणे अजिबात बंधनकारक नाही. त्यामुळे ४५३ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधी मतदारांनी कोणत्याही प्रकारचा संभ्रम मनात न बाळगता, निर्भयपणे व नियमानुसार आपल्या पसंतीचा हक्क बजवावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी केले आहे. यावेळी तीन उमेदवारांची नावे मतपत्रिकेवर राहतील, यापैकी कोणत्याही एका उमेदवाराला पसंतीक्रम एक देणे अनिवार्य आहे. आयोगाने पुरविलेल्या पेनद्वारे उमेदवारांना पसंतीक्रम न लिहिण्यास मतपत्रिका बाद होते. गुरुवार दिनांक १८ जून २०२६ रोजी अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रावर करण्यात आलेल्या नियोजन व व्यवस्थापनाला घेऊन निवडणूक विभागाच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने देण्यात आलेल्या सूचना – नियमावली तसेच मार्गदर्शकतत्वाचे पालन करीत करण्यात आलेल्या उपाययोजना व अंमलबजावणीला घेऊन पूरक – विस्तृतपणे माहिती देताना जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती उपजिल्हा निवडणूक अधिकारी – श्री. शिवाजी शिंदे यांनी दिली

# मुंबई ते अमरावती विशेष गाडी धावणार

## मध्य रेल्वेचा निर्णय




**विद्वतभा प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वेद्वारे छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस ते अमरावती दरम्यान विशेष एकेरी गाडी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. या विशेष रेल्वे गाडीमुळे सुट्टीच्या काळात प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

गाडी क्रमांक ०११५५ एकेरी विशेष १८ आणि १९ जून रोजी छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी अमरावती येथे १२.३० वाजता पोहोचेल. या विशेष गाडीच्या दोन सेवा होतील. या विशेष गाडीला दादर , ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगांव, भुसावळ, मलकापूर, शेगांव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा येथे थांबा देण्यात आला आहे. दोन वातानुकूलित तृतीय, आठ शयनयान, सहा सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन अशी गाडीची संरचना राहील. या एकेरी विशेष गाडीचे आरक्षण १७ जूनपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच रेल्वेच्या संकेतस्थळावर सुरू करण्यात आले आहे.

छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस ते अमरावती दरम्यान विशेष एकेरी गाडी चालविण्यात येणार असल्याने विदर्भात येणाऱ्या प्रवाशांना त्याचा विशेष लाभ होणार आहे. सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्यांचा काळ सुरू आहे. त्यामुळे रेल्वे गाड्यांमध्ये प्रवाशांची प्रचंड गर्दी दिसून येते. या अतिरिक्त गर्दीच्या काळात नियमित धावणाऱ्या रेल्वे गाड्यांचे आरक्षण अगोदरच पूर्ण झाले. प्रवाशांना आरक्षण मिळत नसल्याची स्थिती आहे. या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेकडून विशेष गाडी चालवण्यात येत असल्याने प्रवाशांना त्याचा मोठा लाभ होईल.

अनधिकृत आणि विनातिकिट प्रवासावर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील वाणिज्य विभागाने तिकीट तपासणी मोहीम अधिक व्यापक केली. मेल–एक्सप्रेस, प्रवासी व विशेष गाड्यांमध्ये नियमितपणे तिकीट तपासणी मोहीम राबवल्या जात आहेत. आर्थिक वर्ष २०२६–२७ साठी तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी एप्रिल ते मे या कालावधीत विनातिकीट प्रवासाच्या दोन लाख प्रकरणांमधून २१.८६ कोटी रुपयाचा महसूल प्राप्त केला. अनियमित प्रवासाच्या एकूण ७९ हजार ८८० प्रकरणांमधून ५.९८ कोटी, विनातिकीट प्रवासाच्या एकूण एक लाख १८ हजार ९१० प्रकरणांमधून १५.८७ कोटी, तसेच बुक न केलेल्या सामान एकूण एक हजार प्रकरणांमधून एक लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

# पहिले आमदारांचे १० टक्के द्या, मगच काम घ्या

## यवतमाळच्या कंत्राटदार अध्यक्षांनी भर अधिवेशनात काढले व्यवस्थेचे वाभाडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ यवतमाळ**

‘शासकीय काम घ्यायचे असेल तर पहिले १० टक्के आमदाराला द्यायचे, काम मिळाल्यावर १८ टक्के जीएसटी भरायचा, पुन्हा साहेबलोकांच्या खर्चासाठी १० टक्के आणि बिल पदरात पाडण्यासाठी ५ टक्के मोजायचे एकूण ५६ टक्के रक्कम जर केवळ टक्केवारी वाटण्यातच जात असेल, तर उर्वरित ३४ टक्क्यांमध्ये कामाची गुणवत्ता कशी राखणार?’ नुकत्याच झालेल्या कंत्राटदार संघटनेच्या महाअधिवेशनात यवतमाळ जिल्हा कंत्राटदार कल्याण संघटनेचे अध्यक्ष प्रवीण उंबरकर यांनी थेट व्यासपीठावरून व्यवस्थेचे वाभाडे काढल्याने संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला आहे.



कोल्हापूर येथे १४ जून रोजी झालेल्या या अधिवेशनातील भ्रष्टाचाराच्या या अघोषित टक्केवारी संस्कृतीवर त्यांनी उडवलेले कोरडे सध्या सोशल मीडियासह सर्वच माध्यमांवर प्रचंड व्हायरल झाले असून, भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाचा दावा करणाऱ्या सत्ताधाऱ्यांची या थेट प्रहाराने मोठी नाचक्की झाली आहे. विशेष म्हणजे, आधी स्वतः टक्केवारी उकळायची आणि काम निकृष्ट दर्जाचे झाले की कंत्राटदारालाच दोषी धरायचे, या लोकप्रतिनिधींच्या दुटप्पी भूमिकेवर उंबरकर यांनी अत्यंत उद्विग्नपणे कठोर शब्दांत प्रहार करत ‘लाच खाणे बंद करा’ असा थेट इशारा दिला आहे.कंत्राटदारांच्या मते, पूर्वी प्रशासनात सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजूर संस्था आणि नोंदणीकृत कंत्राटदारांना निकषानुसार कामे मिळत असत. मात्र, आता काम वाटपापासून ते अंतिम देयके काढण्यापर्यंत टक्केवारीचे गणित प्रचंड वधारले आहे. त्यातच सत्ताधाऱ्यांशी संधान बांधलेल्या निवृत्त अधिकाऱ्यांची व आमदारांच्या निकटवर्तीयांची एक नवी ‘लॉबी’ तयार झाली असून, केवळ त्यांनाच कामे आणि देयके दिली जात असल्याचा गंभीर आरोपही यावेळी करण्यात आला.

# वणव्यांनी मेळघाटातील हजारो हेक्टर जंगल होरपळले

## वनसंपत्तीसह वन्यजीवांचे मोठे नुकसान, आधुनिक यंत्रसामग्रीची गरज



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मेळघाट**

राज्यातील महत्त्वाच्या वनक्षेत्रांपैकी एक असलेल्या मेळघाटातील जंगलांना यंदाही वनव्यांचा मोठा फटका बसला आहे. विविध विभागांमध्ये लागलेल्या आगींमुळे हजारो हेक्टर जंगल होरपळले असून वनसंपत्तीसह जैवविविधतेचे मोठे नुकसान झाले आहे. जंगल संवर्धनासाठी अधिक प्रभावी उपाययोजना आणि आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करण्याची मागणी पर्यावरणप्रेमींकडून होत आहे. मेळघाट हे घनदाट जंगल आणि समृद्ध जैवविविधतेसाठी ओळखले जाते. येथे वाघ, बिबट्या, अस्वल, रानगवे यांसह विविध वन्यप्राणी, पक्षी, सरपटणारे जीव तसेच दुर्मीळ वृक्ष आणि गवतांच्या प्रजाती आढळतात. या वनसंपत्तीच्या संरक्षणासाठी वन अधिकारी, कर्मचारी, वनमजूर आणि रोजंदारी कामगार कार्यरत असले तरी दरवर्षी वनव्यांमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. मेळघाट व्याघ्रप्रकल्प आणि वनविभागाच्या विविध विभागांमध्ये यंदा अनेक ठिकाणी आगी लागल्याच्या घटना घडल्या. या आगीत जंगलातील झाडे, गवत, वनस्पती आणि वन्यजीवांचे अधिवास नष्ट झाले आहेत. या नुकसानीची भरपाई होण्यासाठी अनेक वर्षे लागतात, असे जाणकारांचे मत आहे. वनव्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निरोधक पट्टे, जलद प्रतिसाद पथके आणि आधुनिक अग्निशमन साधनांचा वापर वाढविण्याची गरज व्यक्त होत आहे. तसेच स्थानिक नागरिकांमध्ये जनजागृती करून मानवनिर्मित वनवे रोखण्यावर भर देणे आवश्यक असल्याचे मत पर्यावरण अभ्यासकांनी व्यक्त केले आहे.

# अनुदान रखडल्याने घरकुल लाभार्थ्यांचे बेहाल

## पावसाळा सुरू, चार योजनांमधील लाभार्थ्यांना लागली प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ पथ्रोट**

राज्य शासनाच्या पंतप्रधान, मोदी, रमाई व यशवंत घरकुल आवास या शीर्षकाखाली सुरू असलेल्या चार योजनेंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलांचे अनुदान रखडल्याने अर्धवट बांधकाम झालेल्या लाभार्थ्यांचे पावसाळ्यात बेहाल सुरू झाले आहेत.

शासनाने तातडीने अनुदान देऊन लाभार्थ्यांची समस्या निकाली काढावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

राज्य शासनाने गरजू, दिव्यांग, विधवा अशा व्यक्तींना घरकुल योजनेचा लाभ मिळावा म्हणून चार प्रकारच्या योजना सुरू केल्या आहेत. पथ्रोट ग्रामपंचायत अंतर्गत सदर योजनांत गावातील विविध प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांनी घरकुल योजनेचा लाभ मिळावा म्हणून आवश्यक असणाऱ्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करून ग्रामपंचायतमध्ये अर्ज दिला होता.

त्यानंतर त्यांचे प्रस्ताव मंजूर झाले म्हणून पात्र लाभार्थ्यांनी सध्या वास्तव्यात असलेल्या स्वतःच्या मालकीची जागा घरकुल बांधकामासाठी मोकळी करून दिली आहे. यादरम्यान



त्यांनी आपले संसार भाड्याच्या खोलीत थाटले. यातील काही लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा पहिला व दुसरा हप्ता मिळाल्याने त्यांनी बांधकामाचा मुहूर्त लावला आहे. परंतु बऱ्याचशा लाभार्थ्यांना पहिला हप्ताही मिळाला नसल्यामुळे राहते घर पाडून भाड्याने राहताना त्यांना दोन्हीकडून आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

मोदी आवास योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे शेवटच्या हप्त्याचे मस्टर निघाले, परंतु हप्ता देण्यात आला नाही, हे विशेष. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत २०२४–२५ चा दुसरा हप्ता मिळाला नाही. तसेच या योजनेच्या अगोदरच्या वर्षाचे शेवटचे टप्पेसुद्धा रखडलेलेच आहेत. रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांचा शेवटचा हप्ता थकीत राहिला आहे, ज्यामध्ये १०० वंचित लाभार्थ्यांचा समावेश आहे, तर यशवंत आवास योजनेचा दुसरा हप्ता थकीत आहे. अशाप्रकारे या चारही आवास योजनेचे मागील चार ते सहा महिन्यांच्या कालावधीपासून अनुदान रखडले असल्यामुळे लाभार्थ्यांना खूपच मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे शासनाने तातडीने लाभार्थ्यांना अनुदान देऊन त्यांना सहकार्य करावे, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# जिल्हा परिषदेत केंद्रप्रमुख नियुक्ती प्रक्रियेला वेग

## ६९ जागा रिक्त, १९ जूनला उमेदवारांचे समुपदेशन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**




जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत केंद्रप्रमुख पदाच्या ६९ जागांसाठी शासनस्तरावर घेण्यात आलेल्या मर्यादित स्पर्धा विभागीय परीक्षेची निवड व प्रतीक्षायादी अखेर प्रसिद्ध करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने मंगळवारी (ता. १६) ही यादी जाहीर करण्यात आली असून निवड झालेल्या उमेदवारांचे समुपदेशन १९ जून रोजी होणार आहे. शासनाकडून गुणवत्तायादी प्राप्त झाल्यानंतर केंद्रप्रमुख पदासाठी पात्रतेचे निकष निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार तीन फेब्रुवारी २०२६ पर्यंत टीईटी/सीटीईटी उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांनाच पात्र मानण्यात आले. त्यानंतर निवड व प्रतीक्षायादी प्रसिद्ध झाल्याने अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या केंद्रप्रमुख नियुक्ती प्रक्रियेला गती मिळाली आहे. जिल्ह्यातील विशेषतः आदिवासी व दुर्गम भागांमध्ये



केंद्रप्रमुखांची अनेक पदे रिक्त होती. समुपदेशनानंतर ही पदे मोठ्या प्रमाणावर भरली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शाळांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजावर अधिक प्रभावी नियंत्रण राहणार असून नियमित केंद्रप्रमुख उपलब्ध झाल्यास शाळांवर अनुपस्थित राहणाऱ्या शिक्षकांवरही नियंत्रण येईल, अशी चर्चा शिक्षक वर्तुळात सुरू आहे. दरम्यान, गुणवत्तेनुसार निवडीस पात्र ठरलेले; मात्र तीन फेब्रुवारी २०२६ पूर्वी टीईटी/सीटीईटी उत्तीर्ण नसलेल्या काही शिक्षकांनी या पात्रता अटीविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. याप्रकरणाची सुनावणी २२ जून रोजी होण्याची शक्यता असल्याचे समजते. दुसरीकडे, उर्दू माध्यमातील शिक्षकांच्या प्रतिनिधित्वाचा मुद्दाही पुढे आला आहे. उर्दू शिक्षक संघटनेने केंद्रप्रमुख पदांमध्ये उर्दू शिक्षकांसाठी स्वतंत्र पदे राखीव ठेवण्याची मागणी करीत विभागीय आयुक्तांच्या न्यायालयात दाद मागितली आहे. याप्रकरणाचीही पुढील सुनावणी २२ जून रोजी होणार असल्याची माहिती मिळाली आहे. निवड प्रक्रियेवरील न्यायालयीन व प्रशासकीय निर्णयांकडे आता पात्र उमेदवारांसह संपूर्ण शिक्षक वर्गाचे लक्ष लागले असून, १९ जूनच्या समुपदेशनानंतर केंद्रप्रमुख नियुक्ती प्रक्रियेचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे.